**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक १९१ वा | शुक्रवार ०१ डिसेंबर २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 191 | Date : 01/12/2023 | blow :Friday | Page 4 | Price 4

## आरोग्य यंत्रणा मजबुतीसाठी सर्व जिल्ह्यांमध्ये स्पेशालिटी रुग्णालय : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

रत्नागिरी : सर्वसामान्य जनतेला आरोग्याच्या सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आरोग्य यंत्रणा मजबूत करण्यासाठी पावले उचलत आहोत. प्राथमिक आरोग्य केंद्र अद्ययावत करत आहोत. सर्व जिल्ह्यांमध्ये सर्व सुविधायुक्त स्पेशालिटी रुग्णालये उभारण्यात येतील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सांगितले.

येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते आज लोकार्पण झाले. दिव्यांग लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देऊन 'नमो ११' सूत्री कार्यक्रमाचाही शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री उदय सामंत, वैद्यकीय शिक्षण आयुक्त डॉ. राजीव निवतकर, जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजारी, पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश रामानंद, शिरगावच्या सरपंच फरिदा काझी, माजी आमदार विनय नातू, माजी नगराध्यक्ष राहुल पंडित आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंबंधी निर्णय झाला होता आणि वर्षभरातच त्याचा शुभारंभ होत आहे. ४३० खाटांचे जिल्हा रुग्णालय स्थापन करण्यासाठी मान्यता दिली आहे. ७०० ठिकाणी बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्याची अंमलबजावणी देखील ४०० ठिकाणी झाली आहे. औषध खरेदीचे । **पान २ वर**



## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा शनैश्वरास तेलाभिषेक

अहमदनगर : देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. गुरुवारी त्यांनी शनिशिंगणापूर येथे शनैश्वर मूर्तीचे दर्शन घेतले. चौथऱ्यावर जाऊन शनैश्वर मूर्तीस तेलाभिषेकही केला. त्यानंतर महाप्रसादाचा लाभ घेतला. याप्रसंगी राज्यपाल रमेश बैस, महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकासमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सार्वजनिक बांधकाममंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादा भुसे, खासदार सदाशिव लोखंडे, खासदार डॉ. सुजय विखे-पाटील हे सुद्धा उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे शनिशिंगणापूर देवस्थानाच्या ट्रस्टतर्फे स्वागत करण्यात आले. ज्या चौथऱ्यावर जाऊन राष्ट्रपतींनी दर्शन घेतले, तेथे पूर्वी महिलांना प्रवेश करण्यास बंदी होती. अहमदनगर जिल्हा प्रशासनाच्यावतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी राष्ट्रपतींचा सत्कार केला. शनिशिंगणापूर संस्थानतर्फे राष्ट्रपती मुर्मू यांना शनिदेवाची प्रतिमा भेट देऊन त्यांचा सन्मान केला

## ध्वजदिन निधी संकलनाचा ७ डिसेंबर रोजी शुभारंभ

सोलापूर/प्रतिनिधीः सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२४ संकलनाचा शुभारंभ गुरूवार दि ७ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता होणार आहे. यावेळी ध्वजदिन २०२२ व २०२३ निधी संकलनाचे उत्कृष्ठ संकलन केलेल्या कार्यालयांना पारितोषिक वितरण समारंभ ही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार यांनी दिली आहे. जुने जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात आयोजित या कार्यक्रमासाठी सोलापूर महापालिकेच्या आयुक्त शितल उगले-तेली, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, सोलापूर शहर पोलीस आयुक्त राजेंद्र माने, अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे निवास उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी या कार्यक्रमास जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांचे प्रमुख जिल्ह्यातील माजी सैनिक,/विधवा/ वीरमाता पिता व वीरपत्नी यांनी जुने जिल्हाधिकारी कार्यालय बहुउद्देशीय सभागृह येथे उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर तुंगार यांनी केले आहे.

## आजपासून वाढले गॅस सिलेंडरचे दर; दिल्लीसह मुंबईतही LPG महागला!



मुंबई : आज १ डिसेंबर, आजपासून २०२३ च्या शेवटच्या महिन्याला सुरुवात झाली आहे. वर्षाचा शेवटचा महिना सुरू होताच महागाईचा आणखी एक मोठा झटका सर्वसामान्यांना बसला आहे. ङझत्रऋसिलेंडर आजपासून म्हणजेच, १ डिसेंबर २०२३ पासून, वर्षाच्या शेवटच्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून महाग झाला आहे. आधीपासूनच महागाईच्या गर्तेत अडकलेल्या सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा चाप बसणार आहे.

महिन्याच्या पहिल्याच दिवशी, तेल विपणन कंपन्यांनी एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतींत ४१ रुपयांनी वाढ केली आहे, तर ही वाढ १९ घस व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरांत करण्यात आली आहे. अद्ययावत किमतींनुसार, राजधानी दिल्लीत एका सिलिंडरची किंमत आता १७९६.५० रुपये झाली आहे. तर देशाची आर्थिक राजधानी मुंबईत व्यावसायिक एलपीजी सिलेंडरची किंमत १७२८.०० रुपयांवरुन १७४९.०० रुपये झाली आहे.

एलपीजी सिलेंडरच्या किमती । **पान २ वर**

## 'थँक्यू, वंदे मातरम्, जय हिंद, अशा घोषणा देणं टाळा

### 'परदेश दौऱ्यावर जाण्यापूर्वी केंद्राची परवानगी घ्या'

### राज्यसभा सदस्यांसाठी नव्या मार्गदर्शक सूचना

नवी दिल्ली : संसदेचं हिवाळी अधिवेशन ४ डिसेंबरपासून सुरू होत आहे. त्याआधी राज्यसभा सदस्यांना अनेक मार्गदर्शक तत्त्व जारी करण्यात आली आहेत. आता राज्यसभा खासदारांना सभागृहात जय हिंद, वंदे मातरम, थँक्स (धन्यवाद) अशा घोषणा देता येणार नाहीत. सभागृहात अशा घोषणा देणं खासदारांना टाळावं लागणार आहे. एवढंच नाहीतर राज्यसभा अध्यक्षांनी काही सूचनाही दिल्या आहेत. सभागृहाच्या आत किंवा बाहेर दिलेल्या व्यवस्थेवर टीका करणं खासदारांना टाळावं लागेल. तसेच, खासदारांना सभागृहाच्या नियमांचं पालनं करावं लागेल. सभागृहाच्या कामकाजादरम्यान घोषणाबाजी आणि फलक लावणं किंवा झळकावणंही खासदारांना टाळावं लागेल, अशा सूचना राज्यसभा अध्यक्षांनी दिल्या आहेत.

गुरुवारी जारी करण्यात आलेल्या निर्देशांनुसार, खासदारांनी दिलेली नोटीस जोपर्यंत अध्यक्षांकडून किंवा सभापतींकडून स्विकारली जात नाही, तोपर्यंत त्यांचा प्रचार करु नये किंवा त्यांना प्रसिद्धी देऊ नये, असं राज्यसभेच्या सभापतींकडून देण्यात आलेल्या सूचनांमध्य नमूद । **पान २ वर**

## ठाकरे गटाने बनावट आणि खोटी कागदपत्रं सादर केल्याचा आरोप, शिंदे गटाची विधानसभा अध्यक्षांकडे तक्रार



मुंबई: शिवसेना ठाकरे गटाकडून खोटी आणि बनावट कागदपत्रं सादर केल्याची तक्रार शिंदे गटाने केला आहे. त्यासंबंधी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना अर्ज देण्यात आला असून शिवसेना पक्ष कार्यालयातील कम्पुटर जप्त करण्याची मागणीही केली आहे. शिवसेना १६ आमदारांच्या अपात्रतेची सुनावणी विधानसभा अध्यक्षांसमोर असून त्या दरम्यान शिंदे गटाने ही मागणी केली आहे.

शिवसेना ठाकरे गटाने बनावट आणि खोटी कागदपत्रं सादर केल्याची तक्रार शिंदे गटाने अध्यक्षांकडे केली आहे. २२ आणि २३ जूनच्या संदर्भात जे ईमेल लेटर दिल्याचं ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभूंनी म्हटलं आहे. तो ईमेल आयडी अस्तित्वातच नसल्याचा युक्तीवाद शिंदे गटाने केला. शिवसेना ठाकरे गटाकडून बनावट आणि खोटी कागदपत्रं रेकॉर्डवर आणली जात असल्याची अर्जात तक्रार करण्यात आली आहे. विधान भवनातील शिवसेना पक्ष कार्यालयातील अनिल देसाई, सुनील प्रभू आणि विजय जोशी यांनी वापरलेले कॉम्पुटर, लॅपटॉप, टॅबलेट मोबाईल आणि इतर संपर्काची साधने जप्त करण्याची केली मागणी करण्यात आली आहे.

अध्यक्षांसमोर ठाकरे गटाकडून बनावट कागदपत्रे सूपर्द करण्यात आल्याप्रकरणी शिंदे गटाकडून चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून बनावट आणि खोटी कागदपत्र रेकॉर्डवर आणली जात असल्याची अर्जात केली तक्रार करण्यात आली. ज्या ईमेल आयडीवर एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवल्याचा ठाकरे गटाचा दावा आहे, तो ईमेल आयडी ही अस्तित्वात नसल्याचा दावा शिंदे गटाचे वकील महेश जेठमलानी यांनी केला. या ईमेल आयडीवर ई-मेल करून बाउन्स बॅक झालेल्या। **पान २ वर**




## जिल्ह्यात टंचाईच्या उपाययोजना राबवण्यात कोणीही हलगर्जीपणा करू नये : जिल्हाधिकारी

*टँकर लागणाऱ्या गावांची संयुक्त पाहणी तहसिलदार, गट विकास अधिकारी, पाणीपुरवठा विभागाचे उप अभियंता व भूजल यंत्रणेचे अधिकारी यांनी करून १५ दिवसात अहवाल द्यावा

*जिल्ह्यात चारा निर्मितीसाठी पशुसंवर्धन विभागाला बियाणे खरेदीसाठी २ कोटीचा निधी देण्यात येणार

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यात टंचाईची परिस्थिती आहे. माहे जानेवारी २०२४ पासून टँकर सुरू करण्याच्या मागणीत वाढ होऊ शकते. त्या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यातील तहसिलदार, गट विकास अधिकारी, पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता व भूजल यंत्रणेचे अधिकारी यांनी माहे जानेवारी ते जून २०२४ पर्यंत टँकर लागणाऱ्या गावांची संयुक्त पाहणी प्रत्यक्ष जागेवर जाऊन करावी व तसा अहवाल पुढील पंधरा दिवसात सादर करावा. तसेच टंचाईच्या उपाययोजना राबविण्यात कोणीही हलगर्जीपणा करू नये, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधिन शेळकंदे, उपजिल्हाधिकारी महसूल विठ्ठल उदमले, उपजिल्हाधिकारी रोहयो चारुशीला देशमुख, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता पी. व्ही. पाटील, कृषी उपसंचालक राजकुमार मोरे, जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. दामा, शिक्षणाधिकारी प्रा. प्रसाद मिरकले, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, उपविभागीय अधिकारी अमित माळी, गजानन गुरव, तहसिलदार, गटविकास अधिकारी, नगरपालिकांचे मुख्याधिकारी तसेच संबधित अन्य विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, जिल्ह्यात कोणत्या गावात पाण्याच्या टँकरची आवश्यकता आहे. याची संबंधित तालुक्यातील तहसीलदार, गटविकास अधिकारी, पाणीपुरवठा विभागाच्या उपाभियंता तसेच भूजल विभागाचे अधिकारी यांनी दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेऊन पाहणी करावी. गावाची व टँकरसाठी आवश्यक असलेल्या पाणी स्त्रोताची पाहणी करताना संबंधित गावातील ग्रामसेवक व तलाठी यांनाही सोबत घ्यावे. त्यानंतर अभ्यासपूर्ण अहवाल सादर करावा. सर्व उपविभागीय अधिकारी यांनी प्रत्येक तालुक्यात सर्व संबंधित शासकीय यंत्रणाची दुष्काळाच्या पार्श्र्वभूमीवर राबविण्यात येणाऱ्या उपाय योजनाबाबत स्वतंत्र बैठका घेऊन संबंधितांना मार्गदर्शन करावे. प्रत्येक शासकीय यंत्रणांनी दुष्काळाच्या पार्श्र्वभूमीवर सकारात्मक दृष्टिकोन ठेवून काम करावे. या कामात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले.



दुष्काळी परिस्थितीत बँकांनी शेतीशी निगडित असलेल्या कोणत्याही प्रकारच्या कर्जाची वसुली करू नये याबाबत जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकाने सर्व संबंधित बँकांना कळवावे. शेतीशी संबंधित कर्ज वसुलीबाबत तक्रारी आल्यास संबंधित बँकांना तहसीलदारांनी नोटीसा द्याव्यात. तसेच दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यात अवैध पाणी उपसा बाबत वीज वितरण कंपनीने केलेल्या कार्यवाहीची माहिती दर आठवड्याला सादर करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत सर्व शासकीय यंत्रणांनी १३ हजार कामे सेल्फ वर ठेवलेली असून त्यात मोठ्या प्रमाणात वाढ करावी, असेही त्यांनी सुचित केले.

पशुसंवर्धन विभागाने पुढील दोन महिने पुरेल एवढा चारा जिल्ह्यात उपलब्ध असल्याची माहिती दिली आहे. तरी पशुसंवर्धन विभागाने जिल्ह्यातील पाणी उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांचा शोध घ्यावा व त्यांना चारा निर्माण करण्यासाठी बियाणे उपलब्ध करून द्यावे. बियाण्यासाठी नियोजन समिती मधून २ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. तसेच पशुसंवर्धन विभागाने कृषी विभागाशीही संपर्क करून उसाच्या वाड्याचा चारा उपलब्ध झाल्यास व शेतकऱ्यांनी चारा निर्माण केल्यास जिल्ह्यात चारा टंचाईची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी प्रयत्न करावेत व तसा अहवाल सादर करावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील झालेल्या कामांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव जलसंधारण विभागाने त्वरित सादर करावेत. पंढरपूर व माळशिरस तालुक्याने अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामांचे व गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवारअंतर्गत कामांचे प्रस्तावही सादर करावेत. दुष्काळाच्या पार्श्र्वभूमीवर वीज वितरण कंपनीने वीज सवलत द्यावी, शिक्षण विभागाने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची फी माफी सवलत लागू करावी, विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह भोजन देण्यात यावे, प्रत्येक विभागाने दुष्काळी परिस्थितीची जाणीव ठेवून अत्यंत सकारात्मकपणे व गतिमान पद्धतीने कामे करावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या.

जिल्हा परिषदेच्या सर्व यंत्रणांनी जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन विहीर पुनर्भरण, रोजगार हमी योजनेचे सेल्फ वरील कामे, अटल भूजल योजना, पाणीपुरवठ्याच्या योजनांची कामे त्वरित मार्गी लागतील यासाठी प्रयत्न करावेत. सर्व गटविकास अधिकारी व पाणीपुरवठ्याचे अभियंता यांनी तहसीलदार यांच्या समवेत टँकर सुरू करण्याच्या अनुषंगाने स्थळ पाणी करून अहवाल सादर करावा. या परिस्थितीत अत्यंत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सर्व संबंधित यंत्रणांनी काम करणे अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले.

। **पान २ वर**

# संपादकीय

## मराठा मंडळाची गरज..

मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले, खरा वीरवैरी पराधीनतेचा, महाराष्ट्र आधार या भारताचा. महाराष्ट्रातील सगळ्या मराठीजनांचा ऊर अभिमानाने भरून येईल, अशा या चैतन्यपंक्ती थोर विचारवंत आणि समाजसुधारक सेनापती बापट यांनी लिहून ठेवल्या आहेत. पण आजची महाराष्ट्राची परिस्थिती पाहिली तर मराठी माणसे आरक्षणाचा विषय घेऊन एकमेकांविरोधात आक्रमक झालेली दिसत आहेत. त्यातून काही ठिकाणी हिंसाचार पेटला. त्यात आता मराठा, ओबीसी, धनगर, आदिवासी असे विविध समाजगट आरक्षणाच्या मुद्द्यावरून आक्रमक झालेले दिसत आहेत. ही आक्रमकता आणि एकमेकांवरील आरोप-प्रत्यारोप अधिक प्रखर होत चालले आहेत. आरक्षणावरून नेते एकमेकांविषयी बोलताना एकेरीवर येत आहेत. राज्यातील सगळ्या मराठी लोकांनी एकत्र येऊन काही वर्षे लढा दिला आणि संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती केली. महाराष्ट्र हा शब्द तेव्हाच उदयाला आला. संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सगळ्या मराठी माणसांनी एकत्र येऊन आपला विकास आणि उत्कर्ष साधावा यासाठी विकासाच्या अनेक योजना हाती घेतल्या. इतकेच नव्हे तर सगळ्या मराठी भाषिकांनी साहित्यिक आणि सांस्कृतिक विकास साधावा यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. आरक्षणातून आपला विकास साधला जाईल, असे आता प्रत्येकाला वाटत आहे. त्यामुळे त्यांना मिळाले तर माझ्या जातीलाही आरक्षण मिळाले पाहिजे, ही भावना उसळून उठत आहे. त्यातूनच मग मराठे म्हणतात आम्हाला ओबीसी म्हणून आरक्षण द्या. ओबीसी म्हणतात, त्यांना आमच्यात घुसवून तुम्ही आमची गैरसोय कशाला करता? धनगर समाज म्हणतो, आम्हाला आदिवासी म्हणून आरक्षण द्या. तर आदिवासी म्हणतात, त्यांना आमच्यात घुसवून आमची गैरसोय करू नका. असे सगळे समाजगट जातीच्या नावावर वेगळे होऊन आक्रमक झालेले आहेत. त्यातून मार्ग कसा काढायचा, याचे राज्य सरकारसमोर आव्हान उभे राहिलेले आहे. ज्यावेळी भविष्याकडे पाहिल्यावर दिशा दिसत नाही, तेव्हा भूतकाळातील एखादा आदर्श आपल्याला मार्गदर्शन करू शकतो. जेव्हा मराठा सरदार आपापसात लढू लागले तेव्हा पहिले बाजीराव पेशवे यांनी मराठा मंडळाची स्थापना केली. मराठा सरदारांनी एकमेकांविरोधात लढू नये, असा करार केला. आज महाराष्ट्रात मराठीजनांची आरक्षणावरून आपापसात सुरू असलेली लढाई पाहता पुन्हा अशाच मराठा मंडळाची गरज आहे, असे वाटते.

पान १ वरुन

## आरोग्य यंत्रणा मजबुतीसाठी

अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. आरोग्य विभागाचा कायापालट झाला पाहिजे. ज्या अडचणी होत्या त्या दूर केल्या आहेत. महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेची रक्कम ५ लाखांवर वाढविली आहे. शासन आपल्या दारी कार्यक्रमातून १ कोटी ८० लाख लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

कोकणात जेवढी विकास कामे आणता येतील तेवढी आणू. रत्नागिरी विमानतळाला ११८ कोटी मंजूर केले आहेत. मुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता निधीमधून १६० कोटी रुपये खर्च झाले आहेत. राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. परंतु, बळीराजाने चिंता करु नये. सरकार त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे. आरोग्य, शिक्षण, उद्योग, शेतकरी, महिला, कामगार, दिव्यांग, मागासवर्ग घटक अशा सर्व घटकांचा सर्वसमावेशक विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. 'नमो ११' सूत्री कार्यक्रम या सर्व घटकांना न्याय देणारा उपक्रम आहे. शेवटच्या घटकापर्यंत योजनांचा लाभ पोहोचला पाहिजे, हा आमचा प्रयत्न आहे. असेही मुख्यमंत्री म्हणाले.

वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले की, या महाविद्यालयामुळे मागणी पूर्ण झाली आहे. त्यासाठी पालकमंत्री उदय सामंत यांनी पाठपुरावा केला. भविष्यात टप्प्याटप्प्याने पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याचा मानस आहे. बी.एस.सी. नर्सिंग अभ्यासक्रम देखील या महाविद्यालयात सुरु केला जाईल. वैद्यकीय महाविद्यालयामध्ये वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी भरतीसाठीचा शासन निर्णय काढूनच येथे आलो आहे. शेवटच्या माणसापर्यंत योजना पोहचविण्यासाठी अधिकारी आणि पदाधिकारी यांनी हातात हात घालून काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

पालकमंत्री श्री. सामंत म्हणाले की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाविषयी मुख्यमंत्री यांच्याशी मी बोललो. त्यानंतर मुख्यमंत्री यांनी वैद्यकीय शिक्षण सचिवांना दूरध्वनीवरुन मंत्रिमंडळ बैठकीत विषय आणण्यास सांगितले. त्यासाठी ५२२ कोटी रुपये मंजूरही केले. पुणे, मुंबई नंतर रत्नागिरीला परिपूर्ण एज्युकेशन हब बनविण्यासाठी मेडिकल कॉलेजदेखील दिले. उद्योजकांना १०० टक्के इन्सेव्टिव्ह देण्याचा निर्णय देखील घेतला.कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक जिल्हाधिकारी श्री. सिंह यांनी, तर मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजारी यांनी आभार प्रदर्शन केले.

दिव्यांग लाभार्थ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लाभ

वसंत घाणेकर, संजय पावसकर यांना घरकुल योजनेसाठी ६ लाख ८० हजार निधी वितरीत करण्यात आला. दिनेश शितप व मुक्ता शिरसाट, सूरज अवसरे व सोनाली जाधव यांना दिव्यांग-दिव्यांग विवाह योजनेत ५ लाख रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. अंकिता कोलगे, संदीप कांबळे, भारती भायजे, संतोष रहाटे यांना स्वयंचलित ३ चाकी सायकल वाटप करण्यात आल्या. त्याचबरोबर जिल्हा परिषद शाळेतील १४ विद्यार्थ्यांना व्हील चेअर, सीपी चेअरचे वाटप करण्यात आले.

जिल्ह्यातील २ हजार ४४३ सीआरपींना मोबाईल वाटप करण्यात येणार आहे. त्यापैकी प्रातिनिधिक स्वरुपात ६ महिलांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मोबाईल वाटप करण्यात आले. 'नमो शेततळी' अभियानांतर्गत लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करुन त्यांचा सन्मान करण्यात आला.

## आजपासून वाढले गॅस सिलेंडरचे

खजउङ वेबसाईटवर अपडेट करण्यात आल्या असून बदललेल्या किमती १ डिसेंबरपासून लागू झाल्या आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, दिवाळीपूर्वी तेल कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतींत १०३ रुपयांनी वाढ केली होती आणि १ नोव्हेंबर २०२३ रोजी दिल्लीत त्याची किंमत १८३३.०० रुपये झाली होती, मात्र १६ नोव्हेंबरला छठ पुजेच्या निमित्तानं एलपीजी सिलेंडवर दिलासा देण्यात आला होता. आणि सिलेंडरची किंमत ५० रुपयांनी कमी करत १७५५.५० रुपये झाली होती, मात्र वर्षाच्या अखेरच्या महिन्यात पुन्हा एकदा एलपीजीच्या व्यावसायिक सिलेंडरचे दर पुन्हा एकदा ४१ रुपयांनी वाढवले आहेत. ताज्या बदलांनंतर व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या नव्या किमतींबद्दल सांगायचं तर, नमूद केल्याप्रमाणे, राजधानी दिल्लीत आजपासून १९ किलोचा एलपीजी सिलेंडर १७५५.५० रुपयांऐवजी १७९६.५० रुपयांना मिळणार आहे. तर कोलकातामध्ये त्याची किंमत १८८५.५० रुपयांवरून १९०८.०० रुपये करण्यात आली आहे. मुंबईत व्यावसायिक एलपीजी सिलेंडरची किंमत १७२८.०० रुपयांवरुन १७४९.०० रुपये झाली आहे. तर चेन्नईमध्ये व्यावसायिक सिलेंडरसाठी १९४२.०० रुपयांऐवजी १९६८.५० रुपये मोजावे लागतील.

एकीकडे व्यावसायिक सिलेंडरच्या किमतींमध्ये सातत्यानं बदल पाहायला मिळत आहेत. तर तेल कंपन्यांनी १४ किलोग्रॅम वजनाच्या घरगुती सिलेंडच्या किमतींमध्ये कोणताही बदल केलेला नाही. खजउङ च्या अधिकृत वेबसाईटवर नमूद करण्यात आल्यानुसार, दिल्लीत घरगुती सिलेंडर ९.३ रुपयांना, कोलकात्यात ९२९ रुपयांना, मुंबईत ९०२.५० रुपयांना आणि चेन्नईत ९१८.५० रुपयांना उपलब्ध आहे.

## 'थँक्यू, वंदे मातरम्, जय हिंद,

करण्यात आलं आहे. नोटीसशी संबंधित माहिती प्रसारमाध्यमांमध्ये किंवा कोणत्याही व्यासपीठावर, तसेच, इतर सहकारी खासदारांसोबत शेअर करू नये, अशाही सूचना सभापतींकडून देण्यात आल्या आहेत.

परदेशात वैयक्तिक भेटी दरम्यान परदेशी पाहुणचार स्विकारताना संसद सदस्यांनी कठोर मार्गदर्शक तत्त्वांचं पालन केलं पाहिजे. केंद्र सरकारची पूर्वपरवानगी घेणं आवश्यक आहे. आचारसंहितेतील एक नियम खासदारांना अशा भेटवस्तू स्वीकारू नयेत, जे प्रामाणिकपणे आणि निष्पक्षतेनं अधिकृत कर्तव्य पार पाडण्यात व्यत्यय आणतील.राज्यसभेच्या सभापतींकडून सर्व खासदारांसाठी जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. अशातच लोकसभेच्या एथिक्स कमिटीनं कॅश फॉर क्वेरी विवादादरम्यान टीएमसी सदस्य मोहुआ मोईत्रा यांना निलंबित करण्याची मागणी केली आहे. दुबईस्थित उद्योगपती दर्शन हिरानंदानी यांच्याकडून संसदेत प्रश्न विचारण्यासाठी मोईत्रा यांच्यावर 'लाच' घेतल्याचा आरोप लावण्यात आला आहे. हे प्रकरण चर्चेत असतानाच राज्यसभा सभापतींकडून खासदारांसाठी मार्गदर्शक तत्व जारी करण्यात आली आहेत.

निकषांमध्ये असं स्पष्ट नमूद करण्यात आलं आहे की, कोणत्याही परदेशी स्त्रोताकडून म्हणजेच, कोणत्याही देशाच्या सरकारकडून किंवा कोणत्याही परदेशी संस्थेकडून सर्व आमंत्रण परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाद्वारे (MEA) पाठवणं अपेक्षित आहे. असं निमंत्रण थेट मिळाल्यास, खासदारांनी ते परराष्ट्र मंत्रालयाच्या निदर्शनास आणणं आवश्यक आहे. अशावेळी त्या मंत्रालयाची आवश्यक राजकीय मान्यताही घ्यावी लागेल.

## ठाकरे गटाने बनावट आणि

मेलचा रिपोर्ट देखील अध्यक्षांना या पत्रात जोडला आहे.

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्षांसमोर सुनावणी सुरू आहे. गेल्या आठवड्यात सलग तीन दिवस सुनावणी पार पडली होती. त्या दरम्यान शिवसेना ठाकरे गटाचे प्रतोद सुनील प्रभू यांची साक्ष अद्याप पूर्ण झालेली नाही.

त्यामुळे त्यांची पुन्हा साक्ष घेणं सुरू आहे. मागील आठवड्यातील सुनावणीमध्ये २१ जून २०२२ रोजी ठाकरे गटाने बजावलेल्या व्हिपसंदर्भात तसंच २१ जूनला घेण्यात आलेल्या बैठकीत शिवसेना ठाकरे गटाने जो ठराव मांडला होता, त्यासंदर्भात अनेक प्रश्न, उपप्रश्न सुनील प्रभू यांना विचारण्यात आले होते.

आतापर्यंत झालेल्या सुनावणीमध्ये सुनील प्रभू यांनी जारी केलेला २१ जून २०२२ रोजी चा व्हीप, बैठकीतील ठराव, बैठकीतील आमदारांनी ठरावाला दिलेला अनुमोदन त्यांच्या सह्या या संदर्भात अनेक प्रश्न उपप्रश्न शिंदे गटाच्या वकिलांकडून विचारण्यात आले.

त्यासोबत ३१ ऑक्टोबर २०१९ रोजी ज्या बैठकीत गटनेता म्हणून एकनाथ शिंदे आणि प्रतोद म्हणून सुनील प्रभू यांची निवड झाली ती निवड शिवसेना पक्षाचे आमदारांनी केली असून पक्षप्रमुख पक्षात कुठलेही पद शिवसेना पक्षाच्या घटनेत नसल्याचा शिंदे गटाच्या वकिलांनी सुनावणी दरम्यान नमूद केलं.

## विशेष लेखुयोजना 'सारथी'च्या.

## 'सारथी'मार्फत नेट, सेट परीक्षेचे दिले जाते मोफत प्रशिक्षण

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी २०१८ मध्ये छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेची (सारथी) स्थापना करण्यात आली. 'शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती' हे ब्रीद घेवून काम करणाऱ्या 'सारथी' संस्थेमार्फत विविध कल्याणकारी उपक्रम व योजना राबविण्याचे काम केले जात असून या योजनांच्या माहितीवर आधारित क्रमशः लेखमालेचा हा चौथा भाग

महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये सहाय्यक प्राध्यापक पदासाठी राज्य पात्रता परीक्षा अर्थात सेट किंवा राष्ट्रीय पात्रता परीक्षा अर्थात नेट परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. सेट किंवा नेट परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना पीएच.डी. प्रवेश परीक्षेतून सूट देण्यात येते. या परीक्षांचे महत्व लक्षात घेवून 'सारथी'मार्फत राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या प्रवर्गातील लक्षित गटातील उमेदवारांना सेट, नेट स्पर्धा परीक्षापूर्व निःशुल्क प्रशिक्षण देण्यात येत आहे.सेट स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षणासाठी दरवर्षी एक हजार उमेदवारांची निवड करण्यात येते, तसेच नेट स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षणासाठीही दरवर्षी एक हजार उमेदवारांची निवड करण्यात येते. या प्रशिक्षणाचा कालावधीत ४ महिन्यांचा असून विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षणासोबत दरमहा ८ हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण शुल्क हे सारथी संस्थेमार्फत पॅनेलवरील प्रशिक्षण संस्थेस अदा करण्यात येते. सद्यस्थितीत पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथील सारथी संस्थेच्या पॅनेलवरील प्रशिक्षण संस्थेमार्फत सेट स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षण देण्यात येते.

सारथी

"शाहू - विचारांना देवूया गती साधुया सर्वांगीण प्रगती"

योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे प्रशिक्षण घेण्यासाठी अर्जदार हा महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या प्रवर्गातील असावा. त्याच्याकडे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले महाराष्ट्र रहिवाशी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेला मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीचा दाखला असावा. उमेदवार कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर पदवीधारक असावा तसेच सेट, नेट परीक्षा देण्यासाठी पात्र असावा. त्याच्याकडे शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे संबंधित तहसीलदार अथवा सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र व नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र किंवा ईडब्लूएस प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उमेदवारांकडून जाहिरातीद्वारे ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतात.

प्रशिक्षणासाठी ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत अर्ज करण्याची संधी

सन २०२३-२४ मध्ये 'सारथी'च्या सेट, नेट स्पर्धा परीक्षापूर्व निःशुल्क प्रशिक्षण योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. https://sarthi-maharashtragov.in/ या संकेतस्थळावर ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत. या संकेतस्थळावर योजनेच्या अटी, शर्ती आणि पात्रता निकषांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

**-तानाजी घोलप, माहिती अधिकारी,**
**जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

# जागतिक दर्जाचे डबेवाला एक्सपिरियंस सेंटर उभारणार : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : मुंबईचे वैभव म्हणून गेट वे ऑफ इंडिया, सीएसटी, वरळी सी लिंक याकडे पाहिले जात असले तरीही जिवंत माणसे हे खरे वैभव असते. डबेवाले हे मुंबईचे खरे वैभव आहे. त्यांचे असामान्य कार्य लोकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यामुळे डबेवाले जरी तंत्रज्ञान वापरत नसतील, तरी तंत्रज्ञानाचा वापर करुन जागतिक दर्जाचे डबेवाला एक्सपिरियंस सेंटर उभारू. यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही अशी ग्वाही




उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुंबई डबेवाला भवनच्या एक्सपिरियन्स सेंटरच्या भूमिपूजन कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी आमदार श्रीकांत भारतीय, नगरसेविका सपना म्हात्रे, मुंबई डबेवाला संघटनेचे माजी अध्यक्ष सोपानकाका मरे, नूतन मुंबई टिफिन बॉक्स सप्लायर्स चॅरिटी ट्रस्टचे अध्यक्ष उल्हास मुके, मुंबई टिफीन बॉक्स सप्लायर्स असोसिएशनचे अध्यक्ष रामदास करवंदे उपस्थित होते.यावेळी बोलताना श्री. फडणवीस म्हणाले, डबेवाले कंप्युटरपेक्षा हुशार आहेत. एकही चूक न होता ते अचूक काम करतात, म्हणून जगभरातील विद्यापीठे, नेते त्यांच्या व्यवस्थापन तंत्राचा अभ्यास करतात. जगभर या असामान्य कामाचे कौतुक केले जाते.

डबेवाल्यांपर्यंत पोहोचायला १०-१५ वर्ष उशीर झाला असला तरी आता डबेवाल्यांशी तयार झालेला ऋणानुबंध कायम राहील.नैसर्गिक आपत्तीमध्ये डबेवाल्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीत स्वखर्चातून मदत केली. डबेवाल्याना घरे मिळवून देण्यासही उशीर झाला, पण आता लवकरच त्यांचे घरांचे स्वप्न पूर्ण होईल. तिन्ही रेल्वे लाईनवर घरांची योजना राबविण्यात येईल.

महाराष्ट्र धर्म, स्वधर्म हा वारकरी संप्रदायामुळे ताठ मानेने उभा आहे. वारकरी वारी चुकवत नाही तसे डबेवाले रोज डबा पोहोचवून वारी करतात. त्यांच्या कामातुन रोज वारी घडते.

यावेळी आमदार श्रीकांत भारतीय प्रास्ताविक करतांना म्हणाले, मुंबईच्या जीवनात भागवत धर्माची पताका जिवंत ठेवण्याचे काम मुंबई डबेवाला यांनी केले आहे. विश्र्वासाहर्ता हा डबेवाला यांचा युनिक सेलिंग पॉईंट आहे.

मुंबई डबेवाला संघटनेचे माजी अध्यक्ष सोपानकाका मरे मनोगत व्यक्त करताना म्हणाले, डबेवाला संघटनेला १२५ वर्षाची वैभवशाली परंपरा आहे. या संघटनेसाठी ५२ वर्ष कामकरीत असताना २५ वर्ष अध्यक्ष म्हणून राहिलो. डबेवाले घरापासून वंचित आहेत. ८० टक्के लोक भाड्याने राहतात. आमचे घराचे स्वप्न उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साकार करतील याची खात्री आहे असे ते म्हणाले.

# नाका कामगारांच्या कौशल्य विकासासाठी ४ कोटी ८५ लाख रुपयांची तरतूद : मंत्री मंगलप्रभात लोढा



मुंबई, : बांधकामाची आधुनिक पद्धती लक्षात घेऊन मुंबई शहर आणि उपनगर येथील ७ हजार ५०० नाका कामगारांना पूर्वज्ञान कौशल्य विकसित करण्यासाठी प्रथम टप्प्यात चार कोटी ८५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रशिक्षण घेणाऱ्या प्रत्येक कामगाराचा कौशल्य विमासुद्धा विभागामार्फत काढण्यात येणार असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत प्रमोद महाजन कौशल्य युवा विकास योजनेतून भारतीय मजदूर संघ आणि बांधकाम सेक्टर स्किल कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने कामगारांना पूर्वज्ञान कौशल्य प्रमाणिकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. लोढा बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सोनवणे, भारतीय मजदूर संघाचे सचिव अनिल घुमने व नाका कामगार उपस्थित होते.मंत्री श्री. लोढा म्हणाले की, राज्यामध्ये बांधकाम क्षेत्रात कुशल कामगारांची आवश्यकता व त्यामधील ५५ टक्के त्रुट लक्षात घेता बांधकाम क्षेत्रामधील ४७ टक्के कुशल कामगारांचा आजही अभाव समोर येतो. महाराष्ट्र हे प्रगतिशील राज्य असून, बांधकाम क्षेत्रात होणारे बदल लक्षात घेऊन नाका कामगारांना कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. बांधकाम कामगारांसाठी पूर्वज्ञान कौशल्य प्रमाणिकरण कार्यक्रम राबवला जात आहे त्याचा लाभ या कामगारांनी घ्यावा.

यावेळी नाका कामगारांना बांधकाम क्षेत्रात देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण विषयक साहित्याचे वाटप करण्यात आले.

## जिल्ह्यात टंचाईच्या उपाययोजना

जिल्ह्यातील माढा, करमाळा, बार्शी, सांगोला व माळशिरस या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झालेला आहे. तर १० नोव्हेंबर २०२३ नुसार सोलापूर जिल्ह्यातील तालुक्यामधील मंडळ निहाय दुष्काळ (४५) जाहीर झालेला आहे. दुष्काळ झालेल्या सर्व गावांमध्ये जमीन महसूल सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुली स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विज बिल ३३.५टक्के सूट, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, भोजन योजना आदी सवलती लागू करण्यात आल्याची माहिती महसूल उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले यांनी दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble



## त्रिशरण एन्लायटन्मेंट फाउंडेशन कडून संविधान दिनानिमित्त विडी कामगार महिलांचा सन्मान सोहळा

सोलापूर/प्रतिनिधी : त्रिशरण एन्लायटन्मेंट फाउंडेशन पुणेच्या व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती प्रज्ञा वाघमारे यांच्या संकल्पनेतून संविधान दिनाचे औचित्य साधून कर्तृत्ववान, कार्यकुशल विडी कामगार महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून त्रिशरण एन्लायटन्मेंट फाउंडेशन पुणे चे राज्य व्यवस्थापक प्रशांतजी वाघमारे उपस्थित होते.

तर व्यासपीठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी व न्यायमंच, सोलापूर चे उपाध्यक्ष ड. जयप्रकाश भंडारे, साबळे वाघिरे अँड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड चे सरव्यवस्थापक बाळासाहेब जगदाळे, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे व्यवस्थापक सगुतरत्न गायकवाड, साबळे वाघिरे अँड कं.प्रा.लि चे कोषाध्यक्ष श्रीनिवास जोशी, सोलापूर बार असोसिएशन, सोलापूरचे माजी खजिनदार ड. चंद्रसेन गायकवाड, ड. स्वाती राठोड, माजी पोलीस उपनिरीक्षक संजय मोतिकर, अंकुश राठोड, साबळे वाघिरे अँड कं.प्रा.लिचे सेंटर मॅनेजर मदन आपटे, त्रिशरण एन्लायटन्मेंट फाउंडेशन सोलापूर जिल्हा समन्वयक तथा पुणे विभाग अध्यक्ष शितल कांबळे आदी उपस्थित होते.

या वेळी त्रिशरण एन्लायटन्मेंट फाउंडेशन पुणे चे राज्य व्यवस्थापक प्रशांतजी वाघमारे यांच्या हस्ते ५० विडी कामगार महिलांचा सन्मानचिन्ह, संविधान उद्देशिका व बुके देऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी बोलताना प्रशांतजी वाघमारे म्हणाले की, त्रिशरण एन्लायटन्मेंट फाउंडेशन च्या वतीने महिलांकरिता विशेष कार्य केले जात आहे. महिलांना सक्षम करण्यासाठी त्यांना व्यवसाय प्रशिक्षण शिबिर देऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले जात आहे. सोलापूर शहरातील विडे कामगार महिलांनी आपल्या परिस्थितीचा बागुलबुवा न करता मुलांना चांगले शिक्षण देऊन मोठ्या पदापर्यंत मजल मारण्याचे पाठबळ दिले. आज कित्येक विडी कामगार महिलांशी मुले मोठमोठ्याला पदावर कार्यरत आहेत याचा सार्थ अभिमान वाटतो.

यावेळी इतर मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना त्रिसरण एन्लायटन्मेंट फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले. हा कार्यक्रम साबळे वाघिरे अँड कंपनी प्रा.लि. १६६१/६२, न्यू पाच्छा पेठ, पोलिस हेड क्वाटर समोर, सोलापूर येथे परपडला. कार्यक्रमाचे स्वागत मदन आपटे यांनी केले. प्रास्ताविक शितल कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रतीक शिंदे यांनी केले तर आभार अखिला वंगा यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मैत्रानी गायकवाड, रुचिता पद्मा, मयुरी ठाकूर, वसुंधरा पवार या समाजकार्य विभागाच्या विद्यार्थिनींनी व साबळे वाघिरे अँड कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे या मागणीसाठी नळदुर्ग येथे शाखीय ब्राह्मण समाजाचे नगर परिषदे समोर लाक्षणिक उपोषण



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे: नळदुर्ग–येथे समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने जालना येथे समाजाचे नेते दिपक रणनवरे यांच्या समर्थनार्थ व भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे,प्रत्येक जिल्ह्यात ब्राह्मण समाजातील विद्यार्थीसाठी वसतिगृह उभारणे,बालवाडी ते उच्च पदवी पर्यंतच शिक्षण मोफत मिळावे,५ लक्ष रु पेक्षा कमी उत्पन्न असणारे ब्राह्मण कुटुंबाकरिता पिवळे रेशन कार्ड देण्यात यावे,सर्व आजारावर मोफत उपचार मिळावेत,इनामी जमिनी हक्क परत मिळावेत,पुरोहिताना मासिक ५ हजार रु मानधन मिळावे,बेरोजगारांना विना सिबिल,विना तारण ५ लक्ष रुपये कर्ज देण्याची व्यवस्था करावी,ब्राह्मण समाजाच्या सुरक्षतेसाठी विशेष कायदा करून सामाजिक विडंबनातून मुक्तता करावी,ब्राह्मण समाजाच्या सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक पातळीवर झालेल्या बदलाचा चांगला वाईट परिणाम शोधण्यासाठी अभ्यास गटाची/आयोगाची शासन स्तरावर नेमणूक करण्यात यावी.आदी मागण्यासाठी नळदुर्ग येथे समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी नगर परिषदेसमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येत आहे .यावेळी समाजाचे अध्यक्ष विनायक अहंकारी,सचिव मुकुंद नाईक,माजी नगरसेवक दिलीप कुलकर्णी,प्रदीप ग्रामोपाध्ये,प्रमोद कुलकर्णी,उमेश नाईक,सचिन भूमकर,सौरभ कुलकर्णी, ज्ञानेश्र्वर केसकर,अजय देशपांडे,सनी भूमकर, पांडुरंग कुलकर्णी,सुधीर पुराणिक, सुभाषराव भूमकर,विशाल 'कुलकर्णी,यांच्या सह ब्राह्मण समाज मोठ्या संख्येने नागरीक या उपोषणास उपस्थित होते या उपोषणास महाराष्ट्र नवनिर्माण सेना,भाजपा,शिवसेना (ठाकरे गट ) नळदुर्ग शहर पत्रकार संघ,राष्ट्रवादी (अजित दादा गट) व इतर संघटनांनी या उपोषणाला पक्ष कार्यकर्त्यांनी यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे.

## धरमतर, बाणकोट खाडीपुलाला तात्काळ ना–हरकत प्रमाणपत्र द्यावे : उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई : पर्यटन विकासासह कोकणच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकणाऱ्या रेवस ते रेड्डी सागरी महामार्गाच्या कामास गती देण्यात यावी. त्या अनुषंगाने धरमतर आणि बाणकोट खाडीवरील पुलाच्या बांधकामासाठी आवश्यक असणारे 'नौकावहनासाठी गाळ्याची उंची व रुंदी' साठीचे ना–हरकत प्रमाणपत्र तत्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाला आज दिले.उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी रेवस ते रेड्डी सागरी महामार्गाच्या कामकाजाचा आढावा मंत्रालयातील त्यांच्या दालनात घेतला. या बैठकीस खासदार सुनील तटकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, गृह (बंदरे) विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माणिकराव गुरसळ, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड उपस्थित होते.



रेवस ते रेड्डी सागरी महामार्गाला गती देण्यासंदर्भात मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, या महामार्गाचे काम गेल्या चार दशकांहून अधिक काळ रखडले आहे. महामार्गाच्या कामाला गती देण्यासाठी मार्च २०२२ मध्ये प्रकल्पाच्या अंतिम आखणीस शासनस्तरावरून मंजुरी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे रेवस ते कारंजा खाडीदरम्यानच्या धरमतर खाडी पुलासाठी ३ हजार ५७ कोटी रुपयांच्या अंदाजित खर्चाच्या बांधकामास देखील प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मात्र, मेरिटाईम बोर्डामार्फत नौकावहनासाठी आवश्यक असणाऱ्या गाळ्याची उंची व रुंदीसाठीचे ना–हरकत प्रमाणपत्र प्रलंबित असल्याने या पुलाच्या निविदेबाबतची पुढील कार्यवाही करता आली नाही. त्यामुळे धरमतर आणि बाणकोट खाडीवरील पुलाचे काम तत्काळ सुरु होण्यासाठी मेरिटाईम बोर्डाने आवश्यक बाबींची पूर्तता करून गतीने कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिले.

महाराष्ट्राला ७२० किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभला असून या किनारपट्टीवर १४ लहान बंदरे व २ प्रमुख बंदरे आहेत. पर्यटन विकासासह कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी रेवस ते रेड्डी महामार्गाची नव्याने आखणी करण्याचे ठरले आहे. त्यानुसार सर्व्हेक्षण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## श्री गुरुदत्त शुगर लि यांच्या वतीने अकिवाट गावामध्ये ३००० डस्टबिन वाटप

शिरोळ/नामदेव निर्मळे : अकिवाट तालुका शिरोळ येथे ग्रामपंचायत ला श्री गुरुदत्त शुगर्स कडून ३००० हजार डस्टबिन वाटप करण्यात आले. स्वच्छतेकडे एक पाऊल असा उपक्रमास प्राधान्य देण्यात आले. ग्रामपंचायत चे घंटागाडी चे उद्घाटन करण्यात आले.

नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे श्री गुरुदत्त शुगर चे नेहमी मोलाचे योगदान असते. कोरोना असो किंवा महापूर असो नेहमी तळमळीने धावून येणारे श्री गुरुदत्त शुगर्स परिवार नेहमी सामाजिक बांधिलकी जपत आलेली आहे. गट,तट न बघता माणुसकी धर्म हा त्यांनी मानलेला आहे. समाजाशी नाळ त्यांची जोडली गेलेली आहे. ही नाळ न तुटण्यासारखी आहे. जाती–धर्माच्या पलीकडे जाऊन श्री गुरुदत्त शुगर परिवार निस्वार्थपणे काम करत असतात श्री गुरुदत्त शुगर चेअरमन मा.माधवराव घाटगे तसेच एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर मा. राहुल दादा घाटगे ,तसेच मा. एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर धीरज घाटगे ,तसेच सर्व संचालक यांचा सामाजिक कार्यात मोठा हातभार आहे. स्वागत व प्रास्ताविक गणपती कागे यांनी केले. मनोगत माजी जिल्हा परिषद सदस्य इकबाल वैरागदार आभार सुहास पाटील यांनी केले. सर्वत्र गावांमध्ये यांचे कौतुक होत आहे.

## सफाई कामगारांच्या विविध मागण्यांबाबत शासन सकारात्मक : मंत्री शंभूराज देसाई

मुंबई : राज्यातील सफाई कामगारांच्या सुविधांसाठी राज्य शासनाने लाड–पागे समिती नेमली होती. या समितीच्या शिफारशींनुसार सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्याबाबत विविध संघटनांकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले होते. या निवेदनातील मागण्यानुसार सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणाऱ्या सर्व सफाई कामगारांना लाड समितीच्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सफाई कामगारांच्या विविध मागण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.



आज मंत्रालयात मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सफाई संवर्गातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या लाड पागे समिती शिफारशींबाबत बैठक घेण्यात आली.


मंत्री श्री. देसाई म्हणाले की, सफाई कामगारांच्या विविध मागण्यासंदर्भात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील समितीने याबाबत निर्णय घेतला आहे. यासंदर्भात वारसा हक्काबाबत पूर्वीचे सर्व शासन निर्णय रद्द करून एकत्रित नवीन शासन निर्णय काढण्यात आला आहे. या निर्णयाबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने स्थगिती दिली आहे. सफाई कामगारांना लाड – पागे समितीच्या शिफारशीबाबत न्यायालयाच्या स्थगितीबाबत सामाजिक न्याय विभागाने पाठपुरावा करून शासनाची बाजू मांडावी, अशा सूचना मंत्री देसाई यांनी यावेळी संबंधितांना दिल्या. समन्वय समितीने आंदोलन करू नये, असे आवाहन मंत्री श्री. देसाई यांनी यावेळी केले.

या बैठकीस समाज कल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, नगर विकास विभागाचे उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर, सामाजिक न्याय विभागाचे उपसचिव र.शि.गोरवे तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी,समन्वय समितीचे सदस्य उपस्थित होते.

## मी बहुरुपी...

स्टार प्रवाहच्या अबोली मालिकेत सुयश टिळक साकारत असलेल्या विविधांगी भूमिकांचं होतंय कौतुक

वेगवेगळ्या छटा असलेल्या भूमिका साकारायला मिळाव्यात हे प्रत्येक कलाकाराचं स्वप्न असतं. कलाकार ती भूमिका फक्त साकारत नाहीत तर त्या भूमिकेशी एकरुप होऊन ती मनापासून जगतात. स्टार प्रवाहच्या अबोली मालिकेत सुयश टिळक साकारत असलेल्या भूमिकेचं सध्या कौतुक होतंय. मालिकेत त्याने आतापर्यंत एक दोन नाही तर तब्बल १५ वेगवेगळी पात्र साकारली आहेत. कधी तो कडकलक्ष्मीच्या रुपात समोर येतो, तर कधी वृद्धाच्या रुपात. कधी तो रिक्षाचालक असतो तर कधी विदुषक. कधी तो दशावतारी रावण असतो तर कधी पोस्टमन. सुयशने मालिकेत परिचारिका, लमाणी स्त्री, जादुगार अशी वेगवेगळी पात्र देखिल साकारली आहेत. थोडक्यात सांगायचं तर भूमिका एक आणि त्याच्या छटा अनेक. मराठी मालिका विश्र्वात हा प्रयोग पहिल्यांदाच होतोय.



अबोली मालिकेतल्या या बहुरुपी पात्राविषयी सांगताना सुयश म्हणाला, 'ही भूमिका साकारताना मी खऱ्या अर्थाने समृद्ध होतोय. एकाच मालिकेत मी आतापर्यंत १५ वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. प्रत्येक पात्र वेगळं आहे. ते समजून घेत त्याप्रमाणे व्यक्त होणं ही वेगळी कसोटी आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे या प्रत्येक पात्रासाठी तयार होताना मी आणि अबोली मालिकेची संपूर्ण टीम प्रचंड मेहनत घेतेय. आमचे मेकअपमन शैलेश पाठारे आणि त्यांची संपूर्ण टीम माझ्या लूकवर विशेष मेहनत घेतात. त्यामुळेच मी साकारलेलं प्रत्येक पात्र वेगळं दिसतं. अबोली मालिकेला प्रेक्षकांचा भरभरुन प्रतिसाद मिळतो आहे आणि यापुढेही मिळत राहील याची खात्री आहे. तेव्हा न चुकता पहा अबोली रात्री १०.३० वाजता फक्त स्टार प्रवाहवर.'

## कल्याण मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कृतिक भवनाचे भूमिपूजन

ठाणे/मिलिंद जाधव :बौध्द समाज संस्कृतिक मंडळ कल्याण तर्फे सहा मजली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कृतिक भवनाचे भूमिपूजन सोहळ नुकताच खडकपाडा गगनगिरी एनक्लेव्ह, येथील कल्याण हॉसपिटलच्या मागे साई चौक जवळ ठाण्याचे समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त समाधान इंगळे यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष एम. एम. कांबळे हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सरचिटणीस एम.एन. साळुंके यांनी केले. गेल्या २५ वर्षांपासून ठाणे जिल्ह्यातील कल्याण नगरीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचे बहुउद्देशीय सांस्कृतिक भवन असावे यासाठी मंडळाच्या पदाधिकायांनी खूप मेहनत व त्रास सहन करून समाजकल्याण विभागाकडून आवश्यक परवानग्या व निधी मंडळाने प्राप्त केला आहे. ७ गुंठे जागा विकत घेऊन या जागेत जिह्यात नावीन्यपूर्ण ठरणारे संस्कृतिक भवन उभे राहणार आहे. या सोहळ्यावेळी संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन माधुरी शिंदे यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन निर्माण करण्यासाठी एम.एन. साळुंके, खजिनदार सदानंद गायकवाड, उपाध्यक्ष घनश्याम गायकवाड, चिटणीस वसंत कदम, चंद्रकांत बाविस्कर, सदस्य शैलेश दोंदे, अजित कांबळे, डॉ.बी. बी. प्रधान, सुरेंद्र मेंढे, बाळासाहेब साळुंके, भगवान नरवाडे आदींनी खूप परिश्रम घेतले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखा पैठने व रोहित जाधव यांनी केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने बौध्द धम्म बांधव उपस्थित होते. या सांस्कृतिक भवनाचे वास्तुविशारद नयन धोलकिया असून, कॉन्ट्रॅक्टर जीवन धिवरे हे आहेत. या सांस्कृतिक भवनाच्या कामासाठी ८ कोटी रुपये शासनाकडून मंजूर झाले आहेत.यावेळी समता संघर्ष सांस्कृतिक मंच, ठाणे–मुंबई प्रस्तुत आंबेडकरी गिते, संविधानावर आधारित पथनाट्य, संविधानावर आधारित गीते अशी



प्रबोधनात्मक कलाकृती सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सदर कार्यक्रमास ठाणे जिल्ह्यातील ५०० ते ७०० नागरिक आवर्जून उपस्थित होते.

## गायक मनोज गांगुर्डे यांना राज्यस्तरीय संविधान सैनिक गौरव पुरस्काराणे सन्मानित

ठाण/मिलिंद जाधव : मोखाडा तालुक्यातील सुप्रसिद्ध आंबेडकरी चळवळीतील गायक मनोज गांगुर्डे यांना डॉ. मित्र चॅरिटेबल ट्रस्ट संविधान सैनिक संघ, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून मिळणारा संविधान सैनिक गौरव पुरस्कार कल्याण येथे माजी राज्य मंत्री दर्जा व श्रम व रोजगार मंत्रालय भारत सरकार प्रतापराव मोहिते पाटील व उपसचिव गृहमंत्रालय महाराष्ट्र राज्य मनोज जाधव यांच्या उपस्थित यंदाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आज २६ नोव्हेंबर राष्ट्रीय संविधान गौरव दिनाचे औचित्य साधून भारतीय संविधानाला अनुसरून विविध प्रकारच्या सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून देशसेवा व सामाजिक कार्य लक्षात घेऊन सदर पुरस्कार गायक मनोज गांगुर्डे यांना संविधान सैनिक संघ महाराष्ट्र राज्य, यांच्याकडून प्रदान करण्यात आला. आपल्या कार्याचा गौरव करणे, आपणांस प्रोत्साहन देणे, समाजामध्ये आपला आदर्श निर्माण करणे आणि राष्ट्र उभारणीच्या कार्यात सतत आपल्याकडून उत्कृष्ट सेवा पडावी, हा या पुरस्काराचे मूळ उद्देश आहेत.

यावेळी मा. राज्यमंत्री दर्जा, श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार डॉ. प्रतापराव मोहिते–पाटील, अध्यक्ष, सरकारी कर्मचारी महासंघ, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य श्री. भारत वानखेडे, उपसचिव, गृहमंत्रालय, महाराष्ट्र श्री. मनोज डी. जाधव, संस्थापक/संघ प्रमुख डॉ. रविंद्र जाधव, कार्याध्यक्षा डॉ. सुरेखा जाधव, अध्यक्ष, महाराष्ट्र रामनाथ भोजने, आद्यक्रांतीविर राघोजी भांगरे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंच ठाणे पालघर अध्यक्ष संजय इधे, भारत भीमटे आदी. उपस्थित होते.



